### आरोग्यमंत्र्यांकडून जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेचा आढावा

# आवश्यक पदे, ट्रामा केअर सेंटर निर्मितीसाठी सकारात्मक सर्व योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवा : आरोग्य मंत्री




■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
जिल्ह्यातील रुग्णालयांसाठी आवश्यक पद मान्यता व प्रक्रिया निश्चितपणे पूर्ण केली जाईल. आवश्यक सुविधांसाठी निधी कमी पडू देणार नाही. तथापि, गरीब व गरजू व्यक्तींना स्थानिक पातळीवर उपचार उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण आरोग्य यंत्रणा सदैव सुसज्ज असली पाहिजे. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, असे प्रतिपादन राज्याच्या आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले.

आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली, त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार अमोल मिटकरी, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, आरोग्य उपसंचालक डॉ. वाकचौरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बळीराम गाढवे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, ग्रामीण भागातील रूग्णालयांमध्ये सर्पदंशावरील लस, औषधे उपलब्ध असतानाही रूग्णांना शहरात यावे लागते अशा तक्रारी आहेत. रूग्णांसाठी ज्या ज्या सुविधा शासनाने करून दिल्या आहेत, त्या गरजूंपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. गर्भलिंगनिदानाबाबत कठोर कायदे असतानाही असे प्रकार घडत असल्याच्याही तक्रारी आहेत. तसे होत असल्यास कठोर कार्यवाही करावी.

पथकांनी अचानक तपासण्या कराव्यात. तपासण्यांची संख्या वाढवावी. मात्र, असा प्रकार कदापि कुठेही घडता कामा नये, असे निर्देश त्यांनी दिले.

## आज पर्यंत प्रारूप प्रभाग रचनावर एकुण ९ हरकती प्राप्त

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
अकोला महानगरपालिकेची आगामी काळात होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला महानगरपलिकेची प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यावर हरकती व सुचना मागविण्यासाठी ३ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वेळ देण्यात आली आहे. या अनुषंगाने आज दि. १० सप्टेंबर २०२५ पर्यंत प्रभाग क्रं.८ चे प्रारूप प्रभाग रचनेबाबत एक हरकती, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूककरिता आपल्या नगर रचना मार्फत करण्यात आलेल्या प्रभाग क्रं. ३ च्या रचनेवर हरकत असल्याबाबत तीन वेग-वेगळ्या हरकती, महानगरपलिका सार्वत्रिक निवडणूककरिता आपल्या नगर रचना मार्फत करण्यात आलेल्या प्रभाग क्रं. ४ च्या रचनेवर हरकत असल्याबाबत एक हरकती.

### पालकमंत्र्यांकडून नियोजित विकासकामांचा आढावा

# प्रशासकीय मान्यतांची कार्यवाही तत्काळ पूर्ण करा : पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्यात अधिकाधिक विकासकामे पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने नियोजित कामांच्या प्रशासकीय कामांच्या मान्यतांची कार्यवाही तत्काळ पूर्ण करावी. मान्यतांअभावी निधी अखर्चित राहता कामा नये.



असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिले.सर्वसाधारण योजनेतील नियोजित विकासकामांबाबत आढावा पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर यांच्यासह सर्व यंत्रणांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, मंजूर निधीतून नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा मिळणे व जिल्ह्यात भरीव विकासकामे निर्माण होणे आवश्यक असते. त्यादृष्टीने करण्यात आलेल्या नियोजनानुसार तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यतांची कार्यवाही तत्काळ पूर्ण करावी. जिल्ह्याचा निधी अखर्चित राहता कामा नये. त्यामुळे १५ सप्टेंबरपर्यंत मान्यतांची कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी दिले.महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, महाऊर्जा, मृद व जलसंधारण, वैद्यकीय महाविद्यालय, क्रीडा, रोजगार व कौशल्य विकास आदी विविध यंत्रणांची कामे, मान्यता प्रक्रियांची सद्य:स्थिती आदींबाबत पालकमंत्र्यांनी आढावा घेतला.

## शिवापूर शेतशिवारातील दहा फूट अजगराला जीवदान

अकोला : जवळच असलेल्या शिवापुर येथे १० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता एक अजगर दिसला. परमेश्वर ढोरे यांनी ताबडतोब सर्पमित्र तथा मानद वन्यजिव रक्षक बाळ काळणे यांना माहिती देताच बाळ काळणे व सर्पमित्र संतोष वाकोडे हे घटनास्थळी गेले. गवताचा रंग व अजगराच्या रंगात साम्य असल्यामुळे बाळ काळणे यांनी नीट पाहणी करत त्यास अनुभव कौशल्याने व्यवस्थीत पकडले त्यांना मोलाची मदत संतोष वाकोडे यांनी केलीअजगर हे महाराष्ट्रातील बहुतांश भागात दिसून येत आहेत. पुर ओसरल्यामुळे सततच्या पावसामुळे जंगलातुन वाहत आलेले अजगर नदी व मोठया नाल्यांच्या पाण्यातुन जवळील शेतात येतात. सदर अजगर परमेश्वर ढोरे, ज्ञानेश्वर ढोरे सुनिल शिरसाट , राजेश दुधंबे, पवन ढोरे किशोर इंगळे, ओम ढोरे, दिपक ढोरे या शेतात काम करणाऱ्यांना दिसला. अजगर हा वन्यजिव ५० वर्षात पहिल्यांदा शिवापुरशेत शिवाऱ्यात दिसल्याचे या गावकऱ्यांनी सांगितले. बाळ काळणे यांनी संपूर्ण वन्यजिव सेवेत आतापर्यंत ६५ च्यावर अजगर सुरक्षित केले आहे. विश्वास थोरात, वनपाल गजानन गायकवाड व रेस्क्यू इंचार्ज गजानन इंगळे यांच्या सहकार्याने या अजगराला सुरक्षित स्थळी सोडण्यात आले.

## अण्णा भाऊ साठे चौक-रेल्वे स्टेशन ते अशोक वाटीका रोडवरील स्ट्रीट लाईट तातडीने सुरु करावेत

### निलेश देव यांची आयुक्तांकडे ठाम मागणी



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
येत्या दसरा (विजयादशमी) व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर अकोला शहरातील महत्त्वाचा व गर्दीचा रेल्वे स्टेशन ते अशोक वाटीका मार्ग अंधारात बुडाला आहे. या रस्त्यावर सुरू असलेले डिव्हायडरचे काम अजून अपूर्ण असून, त्याचदरम्यान मुख्य स्ट्रीट लाईट बंद ठेवण्यात आले आहेत.

परिणामी, रात्रीच्या वेळी या मार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांसमोर मोठ्या प्रमाणावर सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण झाले आहेत.ही बाब गंभीर असल्याने, निलेश देव मित्र मंडळाचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते निलेश देव यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदन सादर करून ठाम मागणी केली आहे की, तातडीने स्ट्रीट लाईट सुरु करावेत व डिव्हायडरचे काम युद्धस्तरावर पूर्ण करण्यात यावे.मागील दीड महिन्यापासून अण्णा भाऊ साठे चौक ते अशोक वाटीका मार्गावर डिव्हायडर बसविण्याचे काम सुरू आहे. कामादरम्यान संपूर्ण लाईट व्यवस्था बंद असल्याने या रस्त्यावर संपूर्ण अंधार पसरतो.हा मार्ग शहराचा प्रमुख प्रवेशद्वार असल्याने, रेल्वे स्टेशनवरून ये-जा करणारे प्रवासी, रुग्णालयात धाव घेणाऱ्या रुग्णवाहिका तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.रात्रीच्या वेळी अपघात, चोरी, गुन्हेगारी कृत्ये तसेच महिलांच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो.अकोला शहरात दरवर्षीप्रमाणे या मार्गावरून दसरा (विजयादशमी) व धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे हजारो भाविक व नागरिक मोठ्या प्रमाणावर प्रवास करतात.

## शहरात मूर्तिकारांची लगबग सुरु

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
सोमवार २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना अश्वीन शुद्ध प्रतिपदेला नवरात्र घटस्थापना असल्यामुळे दुर्गादेवी आणि शारदादेवीच्या मूर्ती बनविण्यासाठी महानगरातील मूर्तिकारांची लगबग सुरू झाली आहे.

९ दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी देवी भक्तांची मोठी तयारी सुरू झाली आहे. घरोघरी तसेच मंडळामध्ये नवदुर्गा स्थापनेची जय्यत तयारी असल्याचे चित्र महागरात पहावयास मिळत आहे. बाजारपेठेतही देवीचा साज, शस्त्र आणि वस्त्र विक्रीस आले आहेत. कुंभारवाड्यात घट तयार करण्यात कुंभार बांधव सज्ज झाले आहेत तसेच सार्वजनिक मंडळांकडून मंडप उभारणीस वेग आला आहे.

# सामान्यांच्या न्याय हक्कासाठी कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरावे :आ शशिकांत शिंदे

### पोलीस लॉन येथे कार्यकर्ता आढावा सभा संपन्न



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
महायुतीच्या या ढेपाललेल्या शासन काळात जनसामान्यचे मूलभूत प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे जनतेत तीव्र असंतोष निर्माण होत आहे. याची जाणीव कार्यकर्त्यांनी घेऊन सामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून आपले कर्तव्य पूर्ण करण्याचे आवाहन राष्ट्रवादी शरद पवारचे प्रदेशाध्यक्ष आ शशिकांत शिंदे यांनी केले.स्थानिक पोलीस लॉन येथे पक्षाची कार्यकर्ता आढावा सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यात शहरी व ग्रामीण भागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग घेत या सभेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी मंचावर माजी राज्यमंत्री व पक्षाचे विदर्भ प्रभारी राजेंद्र शिंगणे, माजी मंत्री गुलाबराव गावंडे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ संतोष कोरपे, जिल्हाध्यक्ष संग्रामदादा गावंडे, महानगर अध्यक्ष रफीक सिद्दिकी,महानगर कार्याध्यक्ष सै युसुफ अली,प्रदेश उपाध्यक्ष श्यामबाबू अवस्थी, प्रदेश सरचिटणीस प्रा विश्वनाथ कांबळे, जिल्हा निरीक्षक पांडुरंग ठाकरे, महानगर निरीक्षक गणेश राय, जिल्हा समनव्यक दिलीप आसरे, जिल्हा महासचिव आनंद पिंटू वानखडे, महानगर कार्याध्यक्ष देवानंद टाले,महिला विभागीय अध्यक्ष सौ नंदाताई पाऊलझगडे,जावेद जकरिया, शंकरराव चौधरी,कैलास गोंडचवर आदी उपस्थित होते.या कार्यकर्ता आढावा सभेत प्रदेशाध्यक्ष आ शिंदे यांनी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा कार्य आढावा घेत त्यांच्याशी संवाद साधला.आगामी स्वायत्त संस्था निवडणुकीत पक्षाच्या प्रामाणिक व कर्तव्यदक्ष कार्यकर्त्यांस न्याय देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी आ शिंदे यांनी पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन केले.

## थोडक्यात

### नाफेडची सोयाबीन, मूग, उडीद खरेदी सुरू करा !

**तेल्हारा :** तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नाफेड अंतर्गत सोयाबीन, मूग, उडीद खरेदी करण्याच्या मागणीचे निवेदन सुरेश कुकडे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांनी जिल्हा मार्केटींग अधिकारी व तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शाम घोंगे, उपसभापती हरिदास वाघ व संचालक मंडळ व सचिव सुरेश सोनोने यांना दिले आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार तालुक्यातील शेतकऱ्यांनी यावर्षी सोयाबीनचा जवळपास ७० टक्के पेरा केला आहे. मोठ्या प्रमाणावर सोयाबीन उत्पादक शेतकरी आहेत. सोयाबीन काढणीनंतर शेतकऱ्यांना व्यापाऱ्याकडून धान्य बाजारात सोयाबीन व इतर पिकाला नगण्य असा भाव दिला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होते. शेतकऱ्याना शासनाचा हमी भाव मिळावा म्हणून तेल्हारा येथे शासनाने सोयाबीन, मूग, उडीदची हमीभावा नाफेड अंतर्गत खरेदी सुरू करण्याची मागणी तेल्हारा तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा मार्केटींग अधिकारी व कृषी उत्पन्न बाजार समितीकडे केली आहे. त्याच बरोबर निवेदनाच्या प्रति शेतकऱ्यांनी पालकमंत्री ना. आकाश फुंडकर, जिल्हाधिकारी अकोला यांना दिल्या आहेत.

## लाडक्या बहिणींनो एसटी प्रवासासाठी काढले का विशेष ओळखपत्र

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
राज्य शासनाने राज्यातील वरिष्ठ नागरिक तसेच महिलांना एसटी प्रवासात पन्नास टक्के सूट दिली आहे या सवलतीचा राज्यातील लाखो वरिष्ठ नागरिकांनी तसेच महिलांनी लाभ घेतला आहे अनेकांनी देवदर्शन केले तर अनेकांनी लांब वर जाऊन पर्यटनाचा आनंद घेतला एसटीची मग ती कुठलीही साधी, मिनी, निम, आराम, शिवशाही किंवा शिवशाही स्लीपर या सर्व गाड्यांमध्ये महिलांना ५०३ सवलत दिली जात आहे ही सवलत अजूनही कायम आहे परंतु याच्यासाठी यापूर्वी महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना आधार कार्ड दाखवणे गरजेचे होते आधार कार्ड नसेल तर ५०३ सवलतीचा लाभ मिळत नव्हता, अनेकांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्डवर वयामध्ये फेरफार केली होती, या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आता मात्र एसटी महामंडळाने राज्य परिवहन महामंडळाचे अधिकृत ओळखपत्र असणे आवश्यक केले आहे एसटी महामंडळाकडूनच हे ओळखपत्र दिले जाणार असून यासाठी महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना लवकरात लवकर हे ओळखपत्र बनवावे लागणार आहेत जर तुमच्याकडे हे विशेष ओळखपत्र नसेल तर तुम्हाला एसटी प्रवासात ५० टक्के सवलतीचा लाभ मिळणार नाही तुम्हाला प्रवासाचे संपूर्ण तिकिटाचे पैसे द्यावे लागतील शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या सवलतीचा लाभ योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी एसटी महामंडळाने हा निर्णय घेतला असल्याचे बोलला जात आहे सवलतींचा गैरवापर टाळण्यासाठी महामंडळाकडून अधिकृत ओळखपत्र जारी करण्यात येणार आहे एसटी महामंडळाने घेतलेल्या या निर्णया मुळे सवलतीचा प्रवास योग्य आणि पात्र लाभार्थ्यांना मिळणार आहे तसेच यामुळे योजना अधिक प्रभावी पारदर्शक आणि व्यवस्थित राबविता येणार आहे.

# सरकारी योजनेच्या मायाजाळयात शेतकऱ्यांना फसवु नका अन्यथा रस्त्यावर उतरावे लागेल



### शेतकऱ्यांना नेते प्रकाश पोहरे यांचा सरकारला ईशारा

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
शेतक-यांना विविध योजनेच्या लालसेपोटी शेतक-यापेक्षा सरकारी कंपण्याचे व सेतु केंद्राचेच भले होत आहे.या योजनेच्या मायाजाळयात फसवुन शेतक-यांना भ्रमीत व त्रस्त करण्याचे सरकारी धोरण चुकीचे असुन शेतक-यांना त्रास देण्याचे प्रकार थांबविण्यात आले नाही तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असा इषारा किसान ब्रिगेड चे संस्थापक राश्ट्रीय अध्यक्ष प्रकाष पोहरे यांनी दिला आहे.अकोला येथील किसान ब्रिगेडच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित पत्रकार परिशदेत ते बोलत होते.

यावेळी पुढे बोलतांना शेतकरी नेते प्रकाष पोहरे म्हणाले की अतिवृश्टीग्रस्त शेतक-यांच्या नुकसान भरपाई साठी किंवा पिकविमा योजनेसाठी सुरू असलेली ई-पिक पाहणी ही दोश पुर्ण असुन अनेक षेतक-यांना यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सॅटेलाईट च्या माध्यमाने जर नोंदणी करायची असेल तर भ्रमणध्वनी आणी संगणकप्रणाली व्दारे ही नोंदणी करता येते मात्र स्वःताचे कामधंदे सोडुन शेतक-यांना वारंवार शेतात जावे लागते.

यांचा नाहक त्रास त्यांना सहण करावा लागत आहे.पिकविमा योजना सुध्दा वरली मटक्यासारखी झाली असुन एका शेतक-यांला वेगळा न्याय व दुस-या शेतक-याला वेगळा न्याय का दिला जात आहे शेतक-यांना भल्यापेक्षा विमा कपंण्याचे व सरकारी अधिका-यांचे साटेलोटे असल्याचा आरोप शेतकरी नेते प्रकाष पोहरे यांनी केला आहे. हजारो शेतक-यांनी फार्मर आयडी साठी षंभर ते पाचषे रूपये खर्च केले आहे.

## निधन वार्ता

### सत्यनारायण छागांणी



तेल्हारा शहरातील रामदेव बाबा मंदिराजवळील रहिवासी मनोज, व दिपक, यांचे वडील सत्यनारायण कन्हैयालाल छागांणी यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झालेत्याच्या मागे पत्नी दोन मुले १ मुलगी असा आप्त परिवार आहे.

# उत्तम आरोग्य सुविधा हा प्रत्येकाचा अधिकार अंगीकृत रुग्णालयांची बिले नियमित अदा करणार : आरोग्य मंत्री



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
आरोग्याच्या उत्तम सुविधा मिळणे हा प्रत्येकाचा अधिकार असून त्यादृष्टीने आरोग्य सेवेचे बळकटीकरण करण्यात येत आहे. जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून विनामूल्य उपचार सुविधा उपलब्ध असून, अंगीकृत रूग्णालयांची देयके नियमित अदा केली जातील. उत्तम आरोग्य सुविधांसाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे सार्वजनिक आरोग्य व

### आरोग्यमंत्र्यांची वैद्यकीय व्यावसायिकांशी चर्चा

कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे दिली.अकोला येथील हॉटेल आर. एस. येथे वैद्यकीय व्यावसायिक संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.

माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, विप्लव बाजोरिया, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बळीराम गाढवे, इंडियन मेडिकलअसोसिएशनचे डॉ. संतोष सोमाणी, डॉ. रणजीत देशमुख, अभय जैन, पराग टापरे, डॉ. अग्रवाल आदी उपस्थित होतेआरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले योजनेत रुग्णालयाची देयके दर महिन्याला अदा होतील असा प्रयत्न आहे.

## पीएम नवोदय विद्यालय व्यवस्थापन समितीची बैठक

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :
बाभूळगावस्थित पीएम जवाहर नवोदय विद्यालयात जिल्हाधिकारी वर्षा मीणा यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालय व्यवस्थापन समिती आणि सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

नवोदय विद्यालयातील पाण्याची समस्या, सुरक्षा भिंतीची समस्या अवगत केली. विद्यालयाच्या सुरक्षततेसाठी सोलर दिव्यांची व्यवस्था आणि प्रथमदर्शनी भागाचे सुशोभिकरण तसेच इतर विषयांवर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा मिणा यांनी समस्यांबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या, या बैठकीस जिल्हा मुख्य शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रतिनिधी मृणालिनी धनगरे, जिल्हा शिक्षण अधिकारी प्रतिनिधी विनोद मानकर, विद्यालय व्यवस्थापन समितिचे सदस्य गोपाल सोनटक्के, बबिता पायधन, प्रदीप जाधव, खाद्य सुरक्षा अधिकारी यांचे प्रतिनिधी राष्ट्रपाल वाघूरवाघ उपस्थित होते. प्रास्ताविक उप-प्राचार्य डी. पी. तायडे यांनी तर वरिष्ठ शिक्षक अरूण तागडे यांनी आभार मानले.

# सराफा दुकानातून महिलांनी केली सोन्याची चोरी

**अकोला :** शहरातील जुना कपडा बाजार परिसरातील पटवी ज्वेलर्स या सराफा दुकानात सोन्याची चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तीन अज्ञात महिलांनी आभूषण बघण्याच्या बहाण्याने दुकानात प्रवेश करून सोन्याचे दागिने चोरले. हा संपूर्ण प्रकार दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, पोलिसांनी चोरट्या महिलांना अवघ्या काही तासांत ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार,दुपारी तिन्ही महिला ग्राहक असल्याचे भासवून पटवी ज्वेलर्समध्ये आल्या.

त्यांनी दुकानदाराला विविध प्रकारचे दागिने दाखविण्याची मागणी केली. दागिने पाहण्याच्या दरम्यानच महिलांनी दुकानदाराचे लक्ष विचलित करून सोन्याचे दागिने चोरून नेले. काही वेळानंतर दुकानदाराला चोरीची शंका आली आणि त्याने तातडीने सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेजमध्ये तिन्ही महिला दागिने चोरतानाचे स्पष्ट दृश्य आढळले. घटनेची माहिती त्वरित पोलिसांना देण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज च्या आधारेशोधमोहीम राबवून तिन्ही महिलांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना सिटी कोतवाली पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून पुढील तपासणी पोलीस निरीक्षक व कर्मचारी करीत आहेत.

# महावितरणला वीज क्षेत्रात देशात प्रथम क्रमांक

## केंद्र सरकारच्या मानांकनात महावितरणला १०० पैकी ९३ गुण, 'ए' रेटिंगसह देशात अव्वल

**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने घेतलेल्या मानांकनामध्ये महावितरण कंपनीने १०० पैकी ९३ गुण मिळवून देशात प्रथम क्रमांक मिळिवला आहे. या यशाचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली म हावितरणने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांना जाते, असे मत महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी मुख्यमंत्री, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन लाभल्याचेही सांगितले. ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने आरईसी आणि पॉवर फाउंडेशन ऑफ इंडिया यांनी वीज वितरण कंपन्यांचे हे मानांकन तयार केले आहे. पाच प्रमुख निकषांवर हे मूल्यांकन झाले असून, त्यामध्ये संसाधन पर्याप्तता, ऊर्जा परिवर्तन, नियामक प्रशासन, आर्थिक स्थैर्य आणि सेवा सुलभता यांचा समावेश होता. महावितरणला संसाधन पर्याप्तता (३२ पैकी ३२), ऊर्जा परिवर्तन (१५ पैकी १५) आणि नियामक प्रशासन (५ पैकी ५) या निकषांमध्ये पूर्ण गुण मिळाले. आर्थिक स्थैर्य या निकषात २५ पैकी २४ गुण, तर सेवा सुलभता या निकषात २३ पैकी १७ गुण मिळाले. या मानांकनात महाराष्ट्राने ९३ गुण मिळवत 'ए' श्रेणीत स्थान मिळवले असून, त्याखालोखाल मध्य प्रदेश (८४.५), गोवा (७४), दादरा-नागर हवेली व दीव दमण (७४), गुजरात (६७) आणि छत्तीसगड (५२) गुणांसह क्रमांकावर आहेत. महावितरणने मागील काही वर्षांत ग्राहक सेवा, ऊर्जा नियोजन व नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल उचलले. भविष्यातील वीज मागणी लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या ऊर्जा परिवर्तन आराखड्यानुसार ४५,००० मेगावॅट वीज खरेदी करार करण्यात आले. यामुळे आगामी पाच वर्षांत सुमारे ६६,००० कोटी रुपयांची बचत होणार आहे. या बचतीचा लाभ ग्राहकांच्या वीजदरांमध्ये कपात करून देण्यात आला आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत १६,००० मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्पही महावितरणमार्फत राबवण्यात येत आहे.

## खून प्रकरणात रणजित वाघ दोषी

अकोला : सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाजलेल्या खून प्रकरणात जिल्हा न्यायाधीश २ अकोला श्रीमती पहाडे यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत आरोपी रणजित वाघ यास दोषी ठरवण्यात आले आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक ५१९ / २०१८ अंतर्गत भा. दं. सं. कलम ३०२ (खून), ४५२ ( घरात घुसखोरी), ४५० (गंभीर घरफोडी) व ५०६ ( धमकी) या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणात दीर्घकाळ चाललेल्या साक्षी व पुराव्यांनंतर न्यायालयाने आज बुधवारी आरोपी रणजित वाघ याला दोषी ठरवले. येत्या १२ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षा सुनावण्यात येणार असून सर्वांचे लक्ष या शिक्षेकडे लागले आहे.

# कालवाडीला एक आठवड्यानंतर पाणी पुरवठा

## त्रस्त ग्रामस्थ पाण्यासाठी तीव्र आंदोलनाच्या तयारीत

**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
ग्रामीण पाणीपुरवठा योजने अंतर्गत पाणी पुरवठा सात आठ दिवस होत नसल्यामुळे येथून जवळच असलेल्या कालवाडी येथील त्रस्त गांवकरी तीव्र आंदोलनाच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजने अंतर्गत कालवाडी या गावाला पाणी पुरवठा केल्या जातो. मात्र संबंधित योजनेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हम करे सो कायदा या न्यायाने पाणी पुरवठा होत आहे सात सात दिवसांनंतर पाणी पुरवठा केल्या जातो. धरणं तुडुंब भरले आहेत.नदीनाले काठोकाठ वाहत आहेत.कुठलीही पाणी टंचाई नसतांना पाणी पुरवठा कां होत नाही?असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.हा केवळ यंत्रणेचा भोंगळ कारभार आहे.

कालवाडी हे गांव खारपान पट्ट्यात येते.येथे नळाशिवाय कुठलाही पाण्याचा स्त्रोत नाही.सात सात दिवस नळाला पाणीच येत नाही,नाइलाजाने क्षारयुक्त व अशुद्ध पाणी पिण्याची व आपली तहान भागवावी लागते .हे आरोग्यास अपायकारक असणारे पाणी पिल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, त्यामुळे विविध आजाराच्या साथीची शक्यता निर्माण होते व ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येते, नळ आल्यानंतर पुरेशी साठवणूक व्यवस्था नसल्यामुळे पाणी सात दिवस कसं पुरवावं अशी बिकट परिस्थिति निर्माण झाली आहे. सात दिवसानंतर नळ येत असल्यामुळे शेतमजुरांना मजुरी पाडून पाणी भरावे लागते त्यामुळे त्यांचा आर्थिक नुकसानही होते. गत दोन वर्षापासून योग्य पाणीपुरवठा अभावी कालवाडीब ग्रामस्थ कम ालीचे त्रस्त झाले आहेत. याबाबत लोकप्रतिनिधी मार्फत पाणीपुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क साधूनही हे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत त्यामुळे गावकरी संतप्त आहेत पाणीपुरवठा योग्य प्रकारे झाला नाही तर महिलांसह गावकरी पाणीपुरवठा कार्यालयाला धडक देऊन मोठे वआंदोलन करण्याच्या तयारीत आहेतकालवाडी ग्रामस्थांवर होत असलेला हा अन्याय दूर करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करावी.

### आपल्या सदनिकेचे खऱ्या अर्थाने आपण मालक आहात काय?

# गृहनिर्माण संस्थांना अभिहस्तांतरण आवश्यक : डीडीआर डॉ. प्रवीण लोखंडे

**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
अपार्टमेंटमध्ये सदनिका किंवा सोसायटीत घर घेतल्यानंतर अनेकजण कायदेशीर प्रक्रियेची फारशी माहिती घेत नाहीत. अशा मिळकतींचे अभिहस्तांतरण आवश्यक असून, सर्व गृहनिर्माण संस्थांनी ते करून घेण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे यांनी केले.

जिल्ह्यातील पहिल्या मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया नुकतीच झाल्याचे डॉ. लोखंडे यांनी सांगितले. जिल्ह्यात १०० वर गृहनिर्माण संस्था असून, त्यापैकी ४० संस्था सदनिकाधारक किंवा गाळेधारकांच्या आहेत, मात्र या सोसायट्यांनी अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) केलेले नाही. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) अत्यंत महत्त्वाचे आहे.

संस्थेच्या नावावर जमिनीची थेट मालकी हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेस मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) म्हणतात. विकासक सहकार्य करत नसेल तर सदर प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडुन एकतर्फी पूर्ण करता येते. याद्वारे मालमत्ता विकासकाकडून सहकारी गृहनिर्माण सोसायटीला मालमत्तेची कायदेशीर मालकी मिळू शकते. सोसायटीला पुनर्विकासाचे पूर्ण अधिकार मिळतात. सर्वच हक्क सोसायटीकडे गेल्याने जमीन मालकाला किंवा विकासकाला पुन्हा त्या जमिनीवर दावा करता येत नाही.मानीव अभिहस्तांतरण संस्थेने न केल्यास पुनर्विकासामध्ये जुनी इमारत पाडून नवी इमारत बांधताना त्या सदनिकाधारकांना बऱ्याच त्रासाला सामोरे जावे लागते. मानीव अभिहस्तांतरण करुन घेतल्यास वाढीव एफएसआय, पार्किंगचे नियोजन, टेरेसची मालकी, नविन बांधकाम करता येणे, इमारतीचा पुनर्विकास करता येणे हे फायदे मिळतात.मानीव अभिहस्तांतरण केल्यास पुनर्विकासात वाढीव इमारत चटई क्षेत्र निर्देशांक हा सदनिकाधारकांना मिळणार असल्याने त्याचा संस्थेस फायदा असतो.

# खुन प्रकरणाचा पातुर पोलीसांनी एका तासातच लावला छडा;गुन्हयातील आरोपींना केली अटक

**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
सदर गुन्हयाची हकिकत अशा प्रकारे आहे की, मयत इसम नामे नागेश पायरूजी गोपनारायण, वय सुमारे ४० वर्षे, रा. कानशिवणी हा आज दिनांक १०/०९/२०२५ रोजी दुपारी १६. ०० वाजताचे सुमारास ग्राम अंबाशी येथे आला. सदर ठिकाणी राहणारी त्याची मोठी मेहुणी हिचे घरी भरपुर दारू प्यायलेल्या अवस्थेत जाउन मागील सहा महिन्यांपासुन त्याचे पासुन वेगळी राहणारी त्याची पत्नी कोठे आहे याबाबत विचारणा करून त्याची मोठी मेहुणी आणि दुसरी लहान मेहुणी यांना मारहाण करू लागला.

हे पाहुन मोठया मेहुणीचा मुलगा पुढे आला व त्याने त्या ठिकाणी जवळच पडलेल्या लाकडाने व कोणत्यातरी तीक्ष्ण अशा हत्याराने मयत इसम नागेश याचे डोक्यावर आणि पाठीवर वार केले. या मारहाणीत नागेश हा घरासमोरील रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडुन मयत झाला. सदरची माहिती पातुर पोलीसांना मिळताच त्यांनी सदर घटनेबाबत वरिष्ठांना माहिती देउन घटनास्थळावर धाव घेतली. तसेच घटनास्थळावर पोहचुन एकंदरीत घटनेची



माहिती घेतली. परंतु यातील आरोपीं हे जागेवरून पळुन गेले होते. त्यामुळे पातुर पोलीसांनी गोपणीय बातमीदारांच्या मदतीने अंबाशी व आजुबाजुच्या गावात लपलेल्या खालील नमुद आरोपींचा एक तासाचे आत शोध घेतला.१. सिध्दार्थ शांताराम चोटमल, वय २२ वर्षे, रा. अंबाशी, ता. पातुर जि. अकोला २. श्रीमती रेखा शांताराम चोटमल, वय ४५ वर्षे, रा. अंबाशी ता. पातुर जि. अकोला ३. श्रीमती नंदा दिलीप डोंगरे, वय ४० वर्षे, रा. मलकापुर, ता. जि. अकोलावर नमुद आरोपीना ताब्यात घेउन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत नमुद तीन्ही आरोपींनी गुन्हयाची कबुली दिली.



## MAHAGENCO E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Description / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | IC-II / Rfx No. 3000061653 (Refloated) / Procurement of various types of Pressure Switches and Pressure Gauges for Unit-5 AOH at CSTPS, Chandrapur / Rs.202126/- |
| 2 | CHP-B / Rfx No. 3000061657 / Work Contract to increase coal feed rate (Coal Flow Management) at CHPB of Unit-5, 6 & 7 in CSTPS, Chandrapur / Rs.5064000/- |
| 3 | EM-II / Rfx No. 3000061649 / Supply, Installation, Testing and Commissioning of Main hoist Dynamic braking unit, Controller panels & Limit switches for EOT crane of capacity 100/15 Ton installed at TG Floor of 3X500MW Unit-5, CSTPS Chandrapur during AOH of Unit-5 / Rs.982376/- |
| 4 | EM-II / Rfx No. 3000061651 / Supply, Installation, Testing and Commissioning of Power and control panel for ID, PA & FD Fan EOT Crane Unit-5, Stage-III, CSTPS Chandrapur during AOH of Unit-5 / Rs.2249720/- |
| 5 | IC-II / Rfx No. 3000061696 / Work contract for cleaning and painting of JB, TRB/TRT panels, Instrument racks and Impulse lines flushing during short shut down of Unit-7 / Rs.165950/- |
| 6 | EM-II / Rfx No. 3000061699 (Refloated) / Annual contract for work of rewinding of 3 phase LT motors up to 140 KW in Class "F" insulation along with transportation Unit-5/6/7 CSTPS / Rs.1567918.89/- |
| 7 | CHP-A / Rfx No. 3000061681 / Supply of tramcar wheel pin assembly for ARW system at CHP-A CSTPS / Rs.421750/- |
| 8 | CIVIL / Rfx No. 3000061670 / Annual works of alteration and repairs to aluminium Doors, Windows and allied works and providing & fixing glasses to windows / ventilator at various locations in plant area Stage II, III at CSTPS, Chandrapur / Rs.2894802.38/- |
| 9 | EM-II / Rfx No. 3000061672 / Procurement of termination boot for 11KV critical HT motors installed at Unit-7, during SSD of Unit-7 500MW, CSTPS, Chandrapur / Rs.1038240/- |
| 10 | WTP-III / Rfx No. 3000061730 / Work Contract of Condenser Polishing Unit Maintenance and Servicing, Chemical Treatment of Resin on as and when required basis at WTP-III, Unit no. 8 & 9, (2X500MW), CSTPS, Chandrapur / Rs.2461568.22/- |
| 11 | WTP-III / Rfx No. 3000061727 / AMC for Repairing, Maintenance & Servicing of Coal Testing Equipment's and Instruments at WTP-III, CSTPS, Chandrapur / Rs.258448.06/- |
| 12 | EM-II / Rfx No. 3000061697 / Work of Overhauling / Maintenance / Servicing of HT and LT Boards during shutdown of Unit-7, CSTPS, Chandrapur / Rs.1338750/- |
| 13 | EM-II / Rfx No. 3000061673 / Cleaning & Preventive maintenance of GTR, UAT bus ducts, Removal & restoration of connections of transformers, Work of replacement / screening of Silica Gel in Instrument Air dryer vessel during short shutdown of Unit-7 / Rs.271640.19/- |
| 14 | IC-II / Rfx No. 3000061665 (Refloated) / Work contract for servicing of HP Bypass system with fast operating device (FOD) and Servicing of various solenoid valves during AOH of Unit-5 / Rs.253903/- |
| 15 | TM-II / Rfx No. 3000061755 (Refloated) / Work of inspection and servicing of Steam and Feed line valves during AOH of Unit-5, CSTPS, Chandrapur / Rs.1422703/- |
| 16 | EM-II / Rfx No. 3000061689 (Refloated) / Work of overhauling and testing of Rectiformers during AOH of Unit-5 in FY 2025-26 CSTPS, Chandrapur / Rs.658541.76/- |
| 17 | EM-II / Rfx No. 3000061685 (Refloated) / Servicing / Repairs and attending electrical defects of EOT crane of capacity 100/15 Ton installed at TG Floor of 3X500MW Unit 5,6&7 CSTPS, Chandrapur during AOH of Unit-5 / Rs.183000/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 17)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**


# अथर्व सेवा फाऊंडेशनने सलग ५ दिवस अन्नदानात केले १८०० गरजूंना अन्नदान

**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
स्व. अथर्व अनिल मुळे मल्टीपर्पज फाऊंडेशन गोकुळ कॉलनी अकोलाच्या वतीने दि. ४ ते ८ सप्टेंबर २०२५ असे सलग ५ दिवस रोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत स्व. अथर्व मुळे यांचे पाचव्या स्मृती दिनानिमित्त जिल्हा सर्वोपचार रुग्णालया अकोला येथे दाखल रुग्ण व त्यांच्या गोरगरीब नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले.

सलग ५ दिवस चाललेल्या अन्नदानामध्ये १८०० गरजवंतांना अन्नदान करण्यात आले. प्रा. अनिल मुळे यांनी त्यांचा मुलगा स्व. अथर्वच्या आकस्मिक संशास्यपद मृत्युच्या दुखातुन सावरत त्याच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजातील वंचितांच्या सेवेकरिता त्यांचे



नातेवाईक व स्व. अथर्वच्या मित्रमंडळींच्या सहकार्याने स्व. अथर्व अनिल मुळे मल्टीपर्पज फाऊंडेशन ही संस्था पाच वर्षांपुर्वी स्थापन केली आहे. या संस्थेद्वारे सतत वंचितांची सेवा करण्यात येत आहे. याम ध्ये प्रामुख्याने उत्कर्ष शिशुगृहातील अनाथ चिमुकल्यांना दरमहा आवश्यक असलेली औषधी पुरवणे, हिवाळ्यात ब्लँकेट व वुलन कानटोपी वितरण, उन्हाळ्यात पाणपोई, पावसाळ्यात वड, पिंपळ कडुलिंबाची लागवड व वृक्ष संवर्धन, छत्री वितरण, मोतीबिंदू शस्त्रक्रिया , दिवाळीत मेळघाट परीसरातील आदिवासीबहुल गावात जाऊन प्रत्येक घरात जाऊन गरजु कुंटुबाना फराळ वितरण, होळी सणाला पुरणपोळी तुप वाटप यासह वर्षभर सातत्याने अनेक सेवा प्रकल्प राबवून वंचितांना आधार देण्याचे कार्य करित आहेत.

# ज्योती विद्यालयात कृतज्ञता सप्ताहात विविध स्पर्धा

**अकोला:** ज्योती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब जानोळकर, व्यवस्थापिका प्रतिभा जानोळकर यांची ज्येष्ठ कन्या स्व. ज्योती जानोळकर यांच्या नावे या संस्थेच्या शिक्षण क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात होणाऱ्या प्रगतीमध्ये विविध घटकांचा समावेश आहे.या सप्ताहात विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देऊन त्यांना सर्व क्षेत्रात विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास घडवून आणण्याची आपली सामाजिक बांधिलकी म्हणून ज्योती जानोळकर स्मृतिदिनाचे तसेच संस्थेच्या ४४ वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेने, शाळा व महाविद्यालय विभागातर्फे आयोजित कृतज्ञता सप्ताहात विविध स्पर्धा व उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात बाल गट. वर्ग ३ ते ४ रंगभरा स्पर्धा १५ सप्टेबरला सकाळी ८ वाजता, अ गट वर्ग ५ ते ७ चित्रकला स्पर्धा १६ सप्टेंबर सकाळी ८, विज्ञान प्रदर्शनी १७ सप्टेंबर दुपारी १२.३० वर्ग ५ ते ७ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी, ब गट- वर्ग ८ ते १० विज्ञान प्रदर्शनी १७ सप्टेंबर सकाळी ८ वाजता, निबंध स्पर्धा. १८ सप्टेंबर सकाळी ८ वाजता. वक्तृत्व स्पर्धा, १९ सप्टेंबर सकाळी ८ वाजत, क गट - कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्याकरिता १८ सप्टेंबर निबंध स्पर्धा.

# बलात्कार प्रकरणी कठोर कारवाईची मागणी

## अकोला मुस्लिम समाजाचे पोलिस अधीक्षकांना निवेदन



**▪अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**
६ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला जिल्ह्यातील एका १६ वर्षीय अल्पवयीन व गरीब कुटुंबातील मुलीवर बलात्कार व लैंगिक छळाची गंभीर घटना घडली. या जघन्य प्रकाराविरोधात अकोला मुस्लिम समाजाने आज पोलिस अधीक्षक कार्यालयात भेट देऊन अकोला जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांना कठोर कारवाई करण्याचे निवेदन दिले.

ेया प्रसंगी मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे सदस्य मुफ्ती अशफाक कासमी, जमाते इस्लामी हिंदचे वरिष्ठ सदस्य वझीर जनाब, मरकजी अहले सुन्नतचे अध्यक्ष हाजी मुदाम खान, कच्छी मशीद ट्रस्टचे अध्यक्ष व समाजसेवक जावेद जकरिया, जमाते इस्लामीचे शहराध्यक्ष डॉ. अहमद उरूज, जिल्हाध्यक्ष जमाते इस्लामी हिंद इरफान खान, तसेच सैयद नदीम आणि शाहिद खान उपस्थित होते.सर्व प्रतिनिधींनी या अमानुष घटनेचा तीव्र निषेध नोंदवला आणि म्हणाले की -गुन्हेगार कोणत्याही समाजाचा असो, त्याला कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. असे शैतानी कृत्य करणारा कुठल्याही समाजाचा नसतो. इस्लाम धर्म अशा पापी कृतींना विरोध करतो.

आमचा समाज पीडित मुलगी व तिच्या कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहील.समाज प्रतिनिधींनी प्रशासनाकडे मागणी केली की पीडित कुटुंबाला त्वरित न्याय मिळावा आणि दोषींना कायद्याअंतर्गत कठोरात कठोर शिक्षा व्हावी.

# मध्यस्थी मंडळाचा २२ आक्टोंबरला कार्यारंभ

## राज्यभरातील समन्वयकांच्या वार्षिक सभेचे आयोजन

**▪अकोट,दि ११ (प्रतिनिधी) :**
श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था आकोट



अंतर्गत कार्यवाहीत मध्यस्थी वधूवर सुचक मंडळाचे कार्यकारी परिषदेची महत्वपूर्ण सभा पार पडली या सभेत वर्षभराच्या विवाहविषयक विविध उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे

गत १३वर्षापासून मुला मुलींचे विवाह योग जुळवून यावेत यासाठी मध्यस्थी मंडळाने राज्यभरात लौकिक प्राप्त केला आहे.

### घटस्थापनेच्या मुहूर्तावर नोंदणीस प्रारंभ

मदरवर्षी प्रमाणे घटस्थापनेच्या मुहूर्तावर मध्यस्थी मंडळाचा कार्यारंभ होत असून विवाह इच्छुक युवक युवतीच्या नोंदणी रितसर प्रारंभ होत आहे.याच दिवशी मध्यस्थी मंडळाच्या विभागीय,जिल्हा व तालुका शाखेचे पदाधिकारी, सदस्य , समन्वयकांची वार्षिक सभा आयोजित करण्यात आली आहे.या सभेत मध्यस्थी मंडळाचे कामकाजाला गंतिमान करण्यासाठी विचार मंथन,विवाह विषयक आचार संहिता निश्चित करण्यात येणार आहे.सभेच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब फोकम रे होते राज्यस्तरीय वधूवर परिचय मेळावा २५ आक्टोंबरला मध्यस्थी मंडळ द्वारा राज्यस्तरीय वधूवर परिचय मेळावा २५ आक्टोंबर २०२५ श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे आयोजित करण्यात आला आहे.

### म्हैसणे वालसिंगे यांची निवड

मध्यस्थी मंडळाचे केंद्रीय कार्यकारी मंडळाचे सदस्यफदी सौ शोभाताई म्हैसणे व राममूर्ती वालसिंगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

या शिवाय पुणे अमरावती कारंजा विभागीय मेळावा, परिचय पुस्तिका व दिनदर्शिकेचे प्रकाशन आदी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे माहिती मंडळाचे सचिव सुरेशदादा कराळे यांनी दिली. सभेला मंडळाचे सदस्य विलासराव चोरे, नागोराव कुलट,सौ शोभाताई म्हैसणे,मधुकरराव पुंडकर, राममूर्ती वालसिंगे तथा सुधाकरराव हिंगणकर, प्रा.प्रदीप चोरे, गजानन हिंगणकर,प्रा.वाल्मिक भगत,दिपक वानखडे, गणेशराव पांडे, संस्थेचे व्यवस्थापक अमोल मानकर, मंडळाचे व्यवस्थापक महादेवराव बओरओकआर आदी हजर होते.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

